महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भंडारा
सामान्य रुग्णालय परीसर, भंडारा, महाराष्ट्र
ई मेल :gmcbhandara@gmail.com
फोन नं. ०७१८४-२४२३४७

जा.क्र.शावैमभं/कंत्राटी/सहा.प्राध्या/जाहिरात/ २०५-०८/२०२५ दि. ०६/०३/२०२५

# जाहिरात

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भंडारा येथील **सहाय्यक प्राध्यापक** यांचे पदे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२ दि. ३१ डिसेंबर, २०२०.
२. वै.शि.व औ.द्र.,विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.एलईसी-१४२४/प्र.क्र.२८८/वैसेवा-३, दि. १८.०७.२०२४

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भंडारा या नवनिर्मित संस्थेमध्ये विद्यार्थी व रुग्णहीत लक्षात घेता रिक्त असलेले **सहाय्यक प्राध्यापक** यांचे कंत्राटी स्वरुपात ३६४ दिवसाकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटी व शर्तीच्या अधीन राहून भरण्याबाबतची जाहिरात देण्यात येत असून सदर जाहिरातीचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**पदाचे नाव :- सहाय्यक प्राध्यापक (करार तत्वावर ३६४ दिवसाकरिता )**

| अ.क्र. | विभागाचे नांव | रिक्त पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | ठोक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | ०१ | खुला संवर्ग-४० वर्षा पर्यंत<br>मागास संवर्ग-४५ वर्षा पर्यंत | १.मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (MD/MS/DNB)<br>२. वरीष्ठ निवासी या पदाचा एक वर्षाचा अनुभव बंधनकारक राहील.<br>(त्या बाबतचे आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावे) | रु१,१०,०००/-<br>(एकत्रीत सर्व भत्यासहीत) |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | ०१ | | | |
| ३ | जीवरसायनशास्त्र | ०१ | | | |
| ४ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | | | |
| ५ | औषधवैद्यकशास्त्र | ०२ | | | |
| ६ | शल्यचिकित्साशास्त्र | ०२ | | | |
| ७ | कान,नाक व घसाशास्त्र | ०१ | | | |
| ८. | स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्र | ०१ | | | |
| ९ | बधिरीकरणशास्त्र | ०२ | | | |
| १० | क्ष-किरणशास्त्र | ०१ | | | |
| ११ | इमर्जन्सी मेडीसीन | ०१ | | | |
| | एकुण | १४ | ... | ... | ... |

सहाय्यक प्राध्यापक या पदाचे आरक्षण खालील प्रमाणे राहील.

| प्रवर्ग | एससी | एसटी | ओबीसी+ एसबीसी | वि.जा.(अ) + भ. ज.(ब) | भ.ज.(क) + भ.ज.(ड) | ईडब्ल्युएस | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | १३% | ७% | २१% | ५.५% | ५.५% | १०% | ३८% | १००% |
| पदे | १ पुरुष<br>१ माहिला | १ | १ पुरुष<br>२ माहिला | १ | १ | १ | ३ पुरुष<br>१▲ माहिला<br>१ दिव्यांग | १४ |

▲ माहिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद हे पुरुष उमेदवारामधुन भरण्यात येईल.

१. या संस्थेच्या www.gmcbhandara.in व www.med-edu.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच अर्ज उपलब्ध आहे.
२. अर्ज उपलब्ध :- दि. ०६/०३/२०२५
३. अर्ज सादर करण्याचा शेवटचा :- दि. २६/०३/२०२५ (सायंकाळ ०४.०० पर्यंत )
४. मुलाखतीचा दिनांक व वेळ. :- दि. ०७/०४/२०२५ वेळ:- दु.१२.०० वाजता.
५. मुलाखतीचे ठिकाण :- **अधिष्ठाता कार्यालय, शरीरक्रियाशास्त्र विभाग, शा.वै.म., भंडारा येथे शासकीस सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयात सादर करावे.**
६. सदर जाहिराती मधील पदे कमी-जास्त किंवा रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.
७. शासकीस सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयात सादर करावे.

(मागील पानावर...)

Scanned with CamScanner

८. मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करावे.
९. मुलाखती करिता उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचे दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
१०. उमेदवारांने कुठलाही प्रकारे शिफारस पत्र जोडू नये किंवा इतर माध्यमातून शिफारस केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
११. सदरची पदे ही आरक्षणानूसार भरण्यात येईल.
१२. मुलाखतीनंतर रिक्तपदे कंत्राटी तत्वावर प्रत्येक महिण्याच्या दुस-या बुधवारला वेळ दु.१२:०० वा.(Walk-In-Interview) प्रत्यक्ष मुलाखत घेऊन भरण्यात येईल.

(डॉ.विपुल अंबाडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
भंडारा

**नियम व अटी :-**

१) करार पध्दतीने नियुक्ती कालावधी हा नियमीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील
२) उमेदवाराचे कामकाज समाधारनकारण नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्ठात येईल.
३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनूसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.
४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यावसाय करण्याची मुभा राहील.
५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणत्याही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्यांच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.
७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती आधरसामुग्रीबाबत गोपनीय पाळणे आवश्यक राहील.
८) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करला येणार नाहीत.
९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपतपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल,असे शपथपत्र सादर करण्या-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षण्कि सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.
१०) विगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्यांला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.
११) अर्जदाराने संबंधित पदसाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.
१२) सदर जाहिराती मधील नमुद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णतः रदद करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वतःकडे राखून ठेवला आहे.
१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.
१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.
१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिपदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल)
१७) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी (Online) ऑन लाईन सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

प्रत,

१. मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१

प्रतिलिपी,

१) रोखपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भंडारा
२) सुचना फलक, शावैम, भंडारा

Scanned with CamScanner